# रशिया-युक्रेन युद्ध : जागतिक राजकारण आणि अर्थकारणावर झालेले परिणाम

**डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर,** राज्यशास्त्र विभागप्रमुख, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर ता.शिरोळ, जि. कोल्हापूर

ई-मेल- kdkhaladkar1@gmail.com मो. **8275896100 / 8482989101**

---

21 व्या शतकातील तिसऱ्या दशकाच्या पूर्वार्धात युरोप खंडात रशिया युक्रेन यांच्यात सुरु असलेल युद्ध याकडे जागतिक राजकारणातील एक महत्त्वाची घडामोड म्हणून पाहिले जाते. रशियाने आपल्या प्रचंड लष्करी ताकदीसह युक्रेन या शेजारच्या देशावर 24 फेब्रुवारी 2022 रोजी आक्रमण केले व युद्धाला सुरूवात झाली. त्याला 24 फेब्रुवारी 2023 रोजी एक वर्ष पूर्ण होऊन या युद्धाने दुसऱ्या वर्षात प्रवेश केला आहे. आक्रमक रशिया आणि प्राणपणाने लढणारा युक्रेन यांच्यातील संघर्ष अद्यापही सुरूच आहे. आक्रमक बलाढ्य रशियाच्या पाठीशी चीन आणि छोट्याशा युक्रेनच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणारी नाटो संघटनेतील सदस्य राष्ट्रे विशेषतः अमेरिका व तिची मित्र राष्ट्रे हे आजचे जागतिक राजकारणातील चित्र आहे. परिणामी आज जागतिक राजकारणात कमालीची अस्थिरता निर्माण झालेली आहे. शीतयुद्धोत्तर बहुध्रुवीय जगाची वाटचाल आज द्विध्रुवीय जगाच्या दिशेने होत आहे. या पार्श्वभूमीवर दीर्घकाळ चालू असलेले रशिया-युक्रेन युद्ध व त्याचे जागतिक राजकारण व अर्थकारणावर झालेले परिणाम यांची विश्लेषणात्मक चर्चा, मांडणी प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आलेली आहे, ती पुढीलप्रमाणे-

डिसेंबर 1991 मध्ये सोविएत संघाचे विघटन झाल्यानंतर पूर्वीच्या सोविएत गणराज्यांची अनेक राष्ट्रे निर्माण झाली. त्यातील युक्रेन हे एक. सोविएत संघाच्या विघटनानंतर जी राष्ट्रे निर्माण झाली. त्यातील काही राष्ट्रे अंतर्गत संघर्षाशी तोंड देत आहेत, तर काही आपापसात लढत आहेत. जसे युक्रेन-बयिलो रशिया व रशिया आपापसात लढत आहेत. जॉर्जिया-रशिया यांच्यातील संघर्ष, अझरबैजान व अर्मिनिया यांच्यात पुनः लढाई सुरू झाली असून, त्या अझरबैंजानला तुर्कस्तानची चिथावणी आहे. किर्गीजीस्तान व उजबेकीस्तान यांच्यात लढाई सुरू असून त्यात अनेक लोक मारले जात आहेत. सोविएत संघाच्या विघटनामुळे हे सर्व होत आहे. सन 2000 साली ब्लादीमीर पुतिन यांनी रशियाची सूत्रे हाती घेतली. तेव्हांपासून ते पूर्वाश्रमीचा एकसंघ व बलशाली सोविएत रशिया निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रथम देशांतर्गत आपल्या विरोधी विचारांचे, विरोधकांचे दमन केले, व रशियात सर्वंकष हुकूमशाही सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर त्यांनी आपल्या शेजारची राष्ट्रे जी पूर्वीच्या सोविएत संघाचा एक भाग होती, ती ताब्यात घेऊन रशियात विलीन करून घेण्यावर लक्ष केंद्रित केले. त्यातूनच शेजारी राष्ट्र व रशिया यांच्यात संघर्ष सुरू झाला. त्याचाच एक भाग रशिया-युक्रेन युद्ध होय.

वर्तमान रशिया-युक्रेन युद्धाकडे पहाता वरकरणी रशिया-युक्रेन या दोहांतील हा संघर्ष (युद्ध) वाटत असला तरी रिशियाच्या दृष्टिकोणातून पहायला गेले तर हे युद्ध रशिया आणि युक्रेन यांच्यातील नसून खरा संघर्ष हा रशिया आणि अमेरिका आणि तिची मित्रराष्ट्रे यांच्यातील आहे. 'पुतिन युक्रेनला स्वतंत्र राष्ट्र-मानतच नाहीत व युक्रेनची निर्मिती केल्याबद्दल अगदी लेनिन व ख्रुश्चेव्हसकट आपल्या पूर्वसूरींना दोष देण्यासही ते मागेपुढे पाहत नाहीत. त्यांच्या मतु, युक्रेन हे अमेरिकेच्या हाततील प्यादे आहे. वर्षानुवर्षे अमेरिका आणि युरोपीय देशांनी रशियाच्या ज्या प्रामाणिक मागण्या होत्या, त्यांच्याकडे दुर्लक्ष केले व रशियाच्या पारंपरिक वर्चस्वक्षेत्रात आपले हातपाय पसरण्याचे धोरण चालूच ठेवले. युक्रेन आणि जॉर्जिया हे काळ्या समुद्रावर वसलेले दोन्ही देश रशियाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्वाचे आहेत. अमेरिका आणि युरोपने या देशांना आपल्या लष्करी प्रभावक्षेत्रात आणण्याचा, त्यांना 'नाटो' या लष्करी संघटनेचे सदस्यत्व देण्याचा प्रयत्न केला. त्याचीच प्रतिक्रिया म्हणून रशियाने या युद्धाचा निर्णय घेतला. रशियाच्या दृष्टिकोणातून 2008 मध्ये जॉर्जियावर केलेला हल्ला, 2014 मध्ये युक्रेनमध्ये केलेला हस्तक्षेप आणि आताचे 2022 मधील आक्रमण हे एकाच सूत्रात मांडून दाखवता येईल. पुतिन यांना रशियाचे गतवैभव (1990 पूर्वीचे) पुन्हा मिळवायचे आहे आणि त्यासाठी बाल्टिक समुद्र ते मध्य आशिया पर्यंतच्या प्रदेशावर त्यांना त्यांची अधिसत्ता प्रस्थापित करायची आहे. युक्रेनच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, 2014 पासून रशियाने त्या देशावर युद्ध लादलेले आहे. जरी तेव्हा रशियन फौजा थेट युद्धात उतरलेल्या नसल्या तरी पूर्वेकडील रशियाला लागून असलेल्या 'डॉनबास' मध्ये युक्रेनी सैनिक रशियाने राजकीय, लष्करी व इतर स्वरूपाचा पाठिंबा, दिलेल्या फुटीरतावाद्यांशी लढाई करतच होते. सध्या 2022 मध्ये मात्र रशियाने युक्रेनवर थेट आक्रमण केल्याने रशियन व युक्रेनी सैनिक यांच्यात प्रत्यक्षपणे समोरासमोर सशस्त्र संघर्षाला युद्धातला सुरूवात झाली (दै. लोकसत्ता पुरवणी, रविवार दि. 19 फेब्रुवारी 2023 पृ.2) एकंदरीत पुतीन यांच्या विस्तारवादी धोरणामुळे रशियाच्या शेजारील राष्ट्रामध्ये असुरक्षिततेच्या भावना वाढीस लागला आहे.

रशियाने युक्रेनवरी 24 फेब्रुवारी 2022 रोजी आक्रमण केले त्याला 24 फेब्रुवारी 2023 रोजी एकवर्षे पूर्ण झाले. हा झाला नैमितिक कलावधी. मात्र या दोन देशांमधील संघर्ष त्याहूनही जुना आहे. 'युक्रेन मध्ये असलेल्या रशियन समर्थाकांना पाठबळ देत रशियाचे राष्ट्र-अध्यक्ष, ब्लादिमीर पुतीन यांनी एक डाव आखला, तोही नेमका 2014 च्या फेब्रुवारी महिन्यातच. त्यावेळी रशियाने बळाचा वापर करून युक्रेनचा एक प्रांत असलेल्या क्रिमियाचा ताबा घेतला व तो प्रांत आपल्या देशात विलीन केला. त्यानंतर युक्रेनमधील रशियन समर्थकांना रसद पुरवत पुतीन आणखी प्रांत तोडण्याची तयारी करू लागले. 2014 साली युक्रेनमध्ये युरोमेडन निदर्शनांना सुरूवात झाली व त्यातून क्रांतीचे वारे वाहू लागले. रशियाधार्जिणे युक्रेनचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष व्हिक्टर यानुकोविच पायउतार झाले. त्यानंतर काही दिवसांतच रशियाच्या समर्थकांनी उचल खाल्ली आणि युक्रेनच्या पूर्व तसेच दक्षिण भागांमध्ये संघर्ष सुरू झाला. याचा फायदा घेत रशियाच्या लष्कराने क्रिमियाचा ताबा घेतला. त्यानंतर युक्रेनमधील डॉनबास प्रांतात उठाव झाला. त्या प्रांतातून फुटून डोंटेस्क पीपल्स रिपब्लिक (डीपीआर) व लुहास्क पीपल्स रिपब्लिक (एलुपीआर) असे दोन स्वतंत्र देश निर्माण झाल्याची घोषणा बंडखोरांनी केली.'(परांजपे समीर; कधी थांबणार युद्ध? दै. लोकमत, सारांश पुरवणी, रविवार दि.19 फेब्रुवारी 2023.पृ.1) रशियाने युक्रेनचा क्रिमिया प्रांत ताब्यात घेतल्यानंतर रशियन भाषिक मोठ्या संख्येने असणाऱ्या युक्रेनच्या डॉनबास भागात त्यांनी बंडखोरांना प्रोत्साहन दिले, शस्त्रे दिली. पण रशियाला तो भाग-विशेषतः डेनेस्क आणि लुगान्सक ही मोठी औद्योगिक केंद्रे असणारी शहरे जिंकता आली नाहीत. रशियन पाठिंब्याने लढणाऱ्या बंडखोरांना काबूत आणण्यासाठी युक्रेनने काही धंदेवाईक सैन्यदलाची मदत घेतली आणि बंडखोरांवर अनेक भागात विजय मिळविला. या सैन्यास रशियाचे अध्यक्ष पुतिन 'फॅसिस्ट' म्हणतात. रशियाने आक्रमण करण्याचे आणखी एक कारण म्हणजे युक्रेनमध्ये झालेला सत्ताबदल रशिया धार्जिणे राष्ट्राध्यक्ष व्हिक्टर यानुकोविच पायउतार होऊन त्या जागी रशिया विरोधी वोलोदीमिर जेलेस्की राष्ट्राध्यक्ष झाले. नवे अध्यक्ष झेलेस्की यांची रशियाच्या आक्रमणापासून आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी 'नाटो' या पाश्चिमात्य देशांच्या लष्करी आघाडीत जाण्याची तयारी. यामुळे रशियाला असे वाटलेली, नाटो देश आपल्याभोवती एक घेरा घालत आहेत. (प्रबोधन प्रकाशन, ज्योती, मार्च 2023, पृ.33) युद्धाच्या आधी युक्रेनवर आम्ही आक्रमण करणार नाही हीच भूमिका रशियाने घेतल्याचे दाखवले होते. युक्रेनने नाटो संघटनेत सामील होऊ नये. त्याला युरोपीय देशांनी कोणतीही मदत करू नये. यासाठी पुतीन यांनी खूप आटापिटा (प्रयत्न) केला. मात्र युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेस्की त्याला दाद देत नव्हते. परिणामी रशियाने 24 फेब्रुवारी 2022 रोजी युक्रेनवर आक्रमण केले. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांची राजवट ही हुकूमशाही राजवट आहे आणि पूर्वीच्या सोविएत संघाच्या काळात रशियाचा जसा जागतिक राजकारण व अर्थकारण आणि सैनिक क्षेत्रात दबदबा होता. तसा दबदबा त्यांना पुन्हा निर्माण करायचा आहे. विशेषतः जुन्या सोविएत गणराज्यांना त्यांना आपल्या कह्यामध्ये आणायचे आहे.

'रशिया हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा लष्करी दृष्ट्या सामर्थ्यशाली देश समजला जातो. त्यामुळे लाखो सैन्य व हजारो रणगाड्यांसह हल्ला केल्यानंतर दोन-तीन आठवड्यात युक्रेन शरण येईल, तेथे युक्रेनची राजधानी किव्हवर ताबा मिळवून अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्सकी यांचे सरकार उलथवून सत्तांतर करून आपले हस्तक सरकार स्थापन करता येईल व युक्रेनच्या पूर्वेकडील संपूर्ण डॉनबासचा प्रदेशावर आपणास ताबा मिळविता येईल असा पुतीन यांचा मनसुबा होता. आणि काही दिवसातच किव्ह व खार्किव्ह या महत्त्वाच्या शहरांचा रशियन फौजा तबा घेतील. परंतु युक्रेनमध्ये रशियाला हवा होता तसा मोठा विजय मिळवता आलेला नाही.' 'राष्ट्रपती झेलेन्सकी यांनी याउलट रशियन सैन्याविरूद्ध युक्रेन सैन्याने तिखट प्रतिकार उभा केला आहे. कोणत्याही प्रकारची माघार न घेता रशियन आक्रमणाला धैर्याने तोंड देत आहेत. आणि युक्रेनची जनता देखील त्यांच्या पाठीमागे खंबरीपणे उभी राहिली आहे. त्यामुळे आक्रमणाचा पहिला वार प्रचंड नुकसान सोसून युक्रेनने झेलला आहे. रशियाचेही मोठे नुकसान झाले. युद्धाच्या पहिल्या टप्प्यात रशियाने लुगान्सक व डोनेस्क प्रांतांचा बराच भाग ताब्यात घेतला. मारियापेल हे बंदर ताब्यात घेतले. खेसेन ताब्यात घेतले. एकवेळ युक्रेनचा क्रिमियासह एक लक्ष चौरस कि.मी.चा भाग रशियाच्या ताब्यात होता. युक्रेनचा समुद्र किनारा ताब्यात घेऊन त्याची कोंडी करण्याचा पुतीन यांचा डाव होता.' (प्रबोधन प्रकाशन ज्योती-मार्च 2023, पृ. 33,34) त्याला काही प्रमाणात यशही आले.

रशियन आक्रमणाचा पहिला जोर ओसरल्यानंतर युक्रेनने लढण्याचा निर्णय घेतला. त्यास पाश्चिमात्य राष्ट्राचा पाठिंबा मिळाला. पैसे व शस्त्रास्त्रांची मदत मिळाली. रशियाला रोखण्यासाठी त्यावर अनेक निर्बंध लादण्यात आले, पण चीन, इराण, भारत व इतर देश यांनी निर्बंध पाळले नाहीत. त्यामुळे पुतीन यांनी या निर्बंधास दाद दिली नाही. युद्धाच्या दुसऱ्या टप्प्यात युक्रेनला काही भागात यश मिळाले. खार्किव्ह शहराचा वेढा उठला व खेर्सन ताब्यात घेण्यात आले. पूर्व युक्रेनमध्ये घनघोर युद्ध सुरू झाले. त्याकाळात युक्रेनने सुमारे 15-20 हजार चौरस कि.मी. चा भाग परत मिळवला. रशियन

सैन्याचे मनोबल खचले असताना पुतीन यांनी नवी सैन्यभरती करण्याचे आदेश दिले व युक्रेनची चढाई रोखण्यासाठी ड्रोन्स विमाने, क्षेपणास्त्रे आणि लांब पल्याच्या तोफा यांच्या द्वारा युक्रेनची शहरे, घरे, वीजकेंद्रे, अणुकेंद्रे, दळवणवळ यंत्रणा, पाणीपुरवठा केंद्र व धरणे या पायाभूत रचनांवर सुविधांवर हल्ले करण्यास सुरूवात केली. रशियाने अणुयुद्धाची धमकी दिली आहे. या आक्रमणामुळे युक्रेनच्या सैन्याच्या आघाडीला झळ पोहोचली. कारण कीव्ह, खार्किव्ह या शहरात विजपुरवठा व पाणी पुरवठा बंद झाला. त्यातच युक्रेनला दारुगोळ्याचा तुटवढा भासू लागला. कारण पाश्चात्य देशांच्या पुरवठा यंत्रणांवर दबाव आला होता. यानंतर रशियन सैन्याने प्रखर प्रतिकार करीत युक्रेनच्या सैन्याची आगेकूच रोखण्यात यश मिळविले. यासाठी पुतीन यांनी रशियातील धंदेवाईक सैनिकांची मदत घेतली आहे. त्याआधी त्यांनी चेचेन बंडखोरांची मदत घेतली होती. (प्रबोधन प्रकाशन ज्योती-मार्च 2023) यावरून रशिया साम-दाम-दंड-भेद या मार्गाचा अवलंब करून युक्रेनला आपले अंकित राष्ट्र बनवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे.

रशियन आक्रमणाला रोखण्यात युक्रेनला काही प्रमाणात यश आले असले तरी त्या देशाने याची फार मोठी किंमत चुकवलेली आहे. त्या देशाने क्रिमिया वगळता साधारणतः 15 टक्के भू-भाग आणि लाखभर सैनिक गमावलेले आहेत. काळ्या समुद्राचा उत्तरेकडचा युक्रेनियन किनारा आता पूर्णपणे रशियाच्या ताब्यात आलेला असून, रशियाच्या भूमिपासून क्रिमियापर्यंत सलग असा एक 'लॅण्ड कॉरिडॉर' रशियाने तयार केला आहे. युक्रेनमध्ये किमान साठ लाख नागरिक आपल्या देशात विस्थापित झाले असून, त्याहून अधिक नागरिक देश सोडून गेले आहेत. त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर असह्य ताण पडलेला आहे. रशियाने युक्रेनची आर्थिक कोंडी करण्यासाठी प्रयत्न केला आहे. गेल्या वर्षी रशियाने काळ्या समुद्रात सुरूंग पेरून ठेवल्याने युक्रेनमधील धान्य निर्यात थांबली होती. यामुळे आफ्रिका आणि पश्चिम आशियाई देश संकटात सापडले होते. जगाला धान्यपुरवठा करणाऱ्या या देशातील शेती क्षेत्राचे प्रचंड नुकसान झाले आहे. जागतिक बाजारपेठेत अन्नधान्याच्या किंमती वाढल्या आहेत. परिणामी अनेक राष्ट्र आर्थिक संकटात सापडली आहेत. मात्र असे असले तरीही युक्रेनचा अफगाणिस्तान होणार नाही. युक्रेन ताठ उभा राहण्यात अमेरिका आणि तिच्या मित्रराष्ट्रांना रस आहे. अमेरिकेच्या बाजूला झुकलेला, लोकशाहीवादी स्थिर आणि आर्थिकदृष्ट्या प्रगत युक्रेन रशियाच्या सीमेवर उभा राहणे हे रशियासाठी थेट आव्हान आहे. त्यामुळे असा युक्रेन उभा करण्यासाठी आवश्यक ती मदत अमेरिका आणि युरोपीय देश देत राहतील. विशेषतः युक्रेनला शस्त्रांचा लागेल तेवढा पुरवठा होईल. रशियाला नेमके हेच नको आहे. युक्रेन एक अस्थिर, अपयशी आणि अविकसित राष्ट्र असणे रशियाच्या हिताचे आहे. असा युक्रेन रशियाच्या बाजूने झुकलेला असेल व संरक्षण आणि राजकीय स्थैर्य यासाठी रशियावर अवलंबून असेल. त्यामुळे या संघर्षाला केवळ लष्करी दृष्टीने पाहता येणार नाही. हा मूलतः सत्तासंघर्ष आहे आणि आता त्याला लष्करी परिमाण प्राप्त झाले आहे. (दै. लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, रविवार 19 फेब्रुवारी 2023, पृ.1,2) वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, पाश्चात्य राष्ट्राची युक्रेनला असलेली खंबीर साथ आणि रशियाची आक्रमक विस्तारवादी भूमिका पहाता हे युद्ध दीर्घकाळ चालेल असे दिसते. एकंदरीत रशियाचे आजचे वर्तन पहिल्या महायुद्धापूर्वीच्या इतरांच्या प्रदेशाचे लचके तोडणाऱ्या आक्रमक, विस्तारवादी व रक्तपिपासू देशांची आठवण करून देते.

अशा प्रकारे वर्तमान रशिया-युक्रेन युद्धाच्या वर्षपूर्तीच्या पार्श्वभूमीवर या युद्धाचे सिंहावलोकन करताना असे म्हणता येईल की, 24 फेब्रुवारी 2022 रोजी रशियन फौजा युक्रेनमध्य घुसल्या आणि ररिशया-युक्रेन युद्धाला तोंड फुटले. युद्ध सुरू झाले तेव्हा जगात सर्वत्र चिंतेचा सुर होता की, आता पुढे कय होणार? रशियाच्या अजस्त्र लष्करी सामर्थ्यापुढे युक्रेनचा निभाव लागणार नाही. काही दिवसातच रशिया तो देश सहजरित्या गिळंकृत करणार आणि कदाचित तिसरे महायुद्ध सुरू होईल असेही भाकित अनेकांनी वर्तविले. मात्र आता एक वर्षानंतर या आक्रमणाकडे पाहिल्यास वेगळेच चित्र दिसते. अपेक्षेप्रमाणे युक्रेनमध्ये रशियाला हवा होता तसा मोठा विजय मिळवता आलेला नाही. रशियन फौजांच्या सामर्थ्याविषयी जे अंदाज बांधले जात होते ते खोटे वाटावेत इतकी वाईट कामगिरी या सैन्याने केलेली आहे. देशभरात सर्वत्र युक्रेनच्या सैन्याने तिखट प्रतिकार उभा केलेला आहे. युक्रेनची राजधानी किव्हवर ताबा मिळवण्याची आणि अध्यक्ष वोलोदिमीर झेलन्स्की यांचे सरकार उलथवून लावण्याची रशियन महत्त्वाकांक्षा अपुरीच आहे. उलट किव्ह आणि खारकीव्ह ही दोन्ही मोठी शहरे ताब्यात घेण्यासाठी रशियाने ज्या मोहिमा हाती घेतल्या त्यामध्ये लाजिरवाणा पराभव पत्करावा लागलेला आहे. रशियाला लागून असलेल्या युक्रेनच्या पूर्वेकडील 'डॉनबास' या प्रदेशातील प्रत्येक इंच जमिनीचा ताबा घेण्यासाठी पुतिन यांच्या सैन्याला मोठी किंमत द्यावी लागलेली आहे. रशियाला वर्षभरात दोनवेळा सैन्यभरतीची मोहिम राबवावी लागलेली आहे. अगदी तुरूंगातील अट्टल कैदी देखील जुजबी प्रशिक्षण देऊन रशियाने भरती केले असून, त्यांना युक्रेनच्या भूमीवर लढण्यासाठी पाठवले आहे. रशियाने अण्वस्त्रांच्या वापराची गर्भित धमकी देखील देऊन पाहिली आहे. यावरून रशियाची

परिस्थिती किती प्रतिकूल झाली असावी याचीच ही सारी चिन्हे आहेत. अर्थात मोठे देश असे 'सेटबॅक' पचवू शकतात. रशियाने तेच केले आणि आता रशियन फौजा नव्याने हल्ले करण्यासाठी सज्ज झालेल्या आहेत. हा

दरम्यानच्या काळात ज्या युक्रेनचे अस्तित्वच रशियाला मिटवायचे होते, त्याच युक्रेनमध्ये राष्ट्रवादाला नवसंजीवनी मिळालेली आहे. ज्या झेलेन्स्की यांना रशियाला हटवायचे होते त्यांचे नेतृत्त्व झळाळून निघाले आहे. भ्रष्टाचार आणि गैरकारभार याचे प्रतीक मानला जाणारा हा देश आता युरोपियन महासंघाचा एक सदस्य होण्याच्या दिशेने पावले टाकू लागलेला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अपरिमित नुकसान आणि हाल अपेष्टा सहन करत एक देश म्हणून युक्रेन उभा राहिला आहे. या आक्रमणामुळे रशियाविषयी जी काही थोडीफार सहानुभूती व प्रेम त्या देशात शिल्लक होते ते देखील आता संपुष्टात आलेले आहे. दरम्यानच्या काळात रशियावर अतिशय कठोर असे आर्थिक निर्बंध लादण्यात आले आहेत. मात्र रशियावर याचा फारसा परिणाम झाला नसल्याचे दिसते. आज युरोपात राजनैतिक दृष्ट्या रशिया एकटा पडला असून, त्या देशाचे चीनवरील अवलंबित्व (आर्थिक व लष्करी सामग्रीबाबत) अधिकच वाढलेले आहे. ऑगस्ट 2021 मध्ये अफगाणिस्तानातील मानहानीकारक माघारीनंतर गोंधळलेले वाटणारे पश्चिमी देश अमेरिकेच्या नेतृत्त्वाखाली रशियाला धडा शिकवायला हवा या उर्मीने एकत्र आले आहेत. पाश्चिमात्य देशांकडून युक्रेनला अत्याधुनिक शस्त्रांचा, विमाने, रणगाडे यांचा पुरवठा सुरू आहे. म्हणजे रशियाचे सर्वशक्तीमान अध्यक्ष आणि जगभरातील हुकूमशाही प्रवृत्तीच्या नेत्यांचे आदर्श मानले जाणारे ब्लादिमिर पुतिन यांना जे नको होते तेच नेमके झालेले आहे. मग वर्षभरात दीड हजाराहून अधिक रणगाडे गमावून, साधारणतः दोन लाख रशियन सैनिकांचे रक्त सांडून रशियाने नेमके काय साध्य केले? हा प्रश्न आजही अनुत्तरीतच राहतो.

**रशिया-युक्रेन युद्धाचे जागतिक राजकारण आणि अर्थकारणावर झालेले परिणाम-**

1) रशिया-युक्रेन युद्धाचे जागतिक राजाकरण आणि अर्थकारणावर झालेले परिणाम पहाता, या युद्धामुळे अन्नधान्य, खते आणि तेलाच्या किंमती वाढल्या, कोरोनाच्या संकटातून उभ्या राहू पाहणाऱ्या अनेक देशांचे आर्थिक अंदाजपत्रक त्यामुळे पूर्णतः कोलमडले. पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश यांची आर्थिक अवस्था वाईट होण्यास या युद्धाने हातभार लावलेला आहे. अमेरिकेने रशियावार लादलेल्या कठोर आर्थिक निर्बंधामुळै अनेक देशांची अडचण झालेली आहे. परिणामी अमेरिकी डॉलरला पर्याय शोधण्याचे प्रयत्न धिम्या गतीने का होईना पण सुरू झालेले आहेत. रशियाचे सर्वाधिक आर्थिक अवलंबित्व चीनवर असल्याने 'युआन' या चिनी चलनाचे महत्त्व क्रमाने वाढत जाईल. अशीच चिन्हे आहेत.

2) युक्रेनच्या पाठीशी ठामपणे उभे राहणाऱ्या युरोपीय देशांवर आर्थिक मंदीचे संकट घोंघावत आहे. देशांतर्गत अंसतोषास कसे तोंड द्यायचे हा प्रश्न या देशातील राज्यकर्त्यांसमोर आहे. युरोपीय देश रशियावार ऊर्जेसाठी अवलंबून होते, अजूनही आहेत. मात्र आता या संघर्षामुळे, युरोपच्या ऊर्जापुरवठ्यासाठी पुन्हा एकदा पश्चिम आशिया आणि तिकडे अमेरिका यांचे महत्त्व वाढत चालले आहे. या बदलत्या ऊर्जा धोरणाचे अपरिहार्य परिणाम परराष्ट्र आणि संरक्षण धोरणावर होत असतात.

3) शीतयुद्ध संपल्यावरच्या तीस वर्षात युरोपीय देशांनी आपल्या संरक्षण क्षमता विकसित करण्याकडे दुर्लक्ष केले होते. तसे करून आता चालणार नाही याचीही जाणीव त्यांना झालेली आहे. त्यामुळे आर्थिक मंदीच्या काळात देखील लष्करावरचा खर्च वाढवणे क्रमप्राप्त झालेले आहे.

4) इकडे आशियात रशियाच्या आक्रमणास अमेरिका कसा प्रतिसाद देते याकडे चीनचे बारकाईने लक्ष आहे. जर नजीकच्या भविष्यकाळात तैवानवर आक्रमण करायचे असेल तर अमेरिकेसह इतर पाश्चिमात्य देश काय पावले उचलतील याचे आढाखे चीन बांधतो आहे. रशियाने केलेल्या चुका टाळण्यासाठीही चिनी लष्करी तज्ञ या युद्धाचा अभ्यास करत आहेत.

5) भारताच्या संदर्भात विचार करता या युद्धामुळे आणि रशियावरील निर्बंधामुळे आपण भविष्यात लष्करी साहित्यासाठी रशियावर किती अवलंबून राहायचे याविषयी पुनर्विचार सुरू झालेला आहे. युक्रेनचे युद्ध कशाही तऱ्हेणे संपले तरीही रशियाचे भौगोलिक स्थान, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि बाकीची इतर सामर्थ्यस्थळे पाहता, आपल्याला रशियाला बाजूला काढता येणार नाही. या युद्धामुळे रशियाचे चीनवरील अवलंबित्व वाढणे याचे आपल्यावर थेट प्रतिकूल परिणाम होतात. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात, रशिया आणि अमेरिका इतके एकमेकांच्या विरोधात गेल्याने आपली राजनैतिक 'स्पेस' कमी होते. आपल्यासमोर दक्षिण आशियात आणि सीमारेषांवर आव्हाने आहेत. अस्थिर अफगाणिस्तान-पाकिस्तान, लडाखमध्ये उभ्या ठाकलेल्या चिनी फौजा, नेपाळमधील प्रतिकूल राजकीय परिस्थिती, बांगलादेश व मालदीव मधील वाढता असंतोष, श्रीलंकेच्या आर्थिक अडचणी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर भारत अमेरिका व युरोपीय देशांच्या दबावाला बळी न पडता आपल्या राष्ट्रीय हिताचा विचार करत परराष्ट्र-धोरणाबाबत स्वतंत्रपणे आपली भूमिका घेताना दिसत आहे. प्रतिकूल परिस्थितीतही रशियाशी मैत्रिपूर्ण संबंध कायम ठेवले आहेत. यापूर्वी देखील अमेरिका व

युरोपियन देशाच्या दबावाला बळी न पडता, विशेषतः 1979 साली रशियन सैन्य अफगाणिस्तानात घुसले किंवा 2003 साली अमेरिकेने इराकवर हल्ला केल्यानंतर सुद्धा भारतावर आजच्या सारखाच दबाव होता आणि तेव्हाही भारताने हा दबाव झुगारून देऊन आपल्या राष्ट्रीय हिताचीच भूमिका घेतली होती. आजही आपण रशियाबाबत तीच भूमिका घेत आहोत. ब्राझील, दक्षिण आफ्रिका इ. देशही अशीच स्वतंत्रपणे भूमिका घेत आहेत.'(लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, रविवार दि.19 फेब्रुवारी 2023, पृ.2)

6) या युद्धाचे जगातील सर्वच देशांच्या विशेषतः विकसनशील देशांच्या अर्थकारणावर विपरीत परिणाम होत आहेत. या युद्धामुळे पेट्रोल, गॅस, अन्नधान्य आणि यंत्रसामग्री यांच्या किमंती वाढल्या. आधीच परकीय चलणाचा तुटवडा असणाऱ्या देशांना त्याची झळ बसली. बांगला देशसारखी सुस्थितीत असणारी अर्थव्यवस्था ढासळली. श्रीलंकेपुढे तर अनेक प्रश्न आहेत. पाकिस्तान पुढे गंभीर आर्थिक प्रश्न निर्माण झाले आहेत. या देशाची दिवाळखोरीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे.

7) पाश्चिमात्य देशांच्या आर्थिक निर्बंधाचा रशियावर म्हणावा तसा परिणाम सध्या झाला नाही. पुतीन यांच्या दादागिरीला व युद्धखोरीला युरोपातील काही राष्ट्रे तोंड देऊ शकली नाहीत. कारण त्यांचा प्रयत्न आपले कमीत कमी नुकसान कसे होईल हा राहिला आहे. युरोपातील राष्ट्रे रशियाच्या गॅस पुरवठ्यावर अवलंबून आहेत.

8) संयुक्त राष्ट्रे ही संघटना (लीग ऑफ नेशन्स) कुचकामी यंत्रणा आहे हे सिद्ध झाले कारण रशियाने व्हेटो वापरून आपल्या विरुद्धची कारवाई रोखली.

9) नाटोची सदस्य संख्या वाढेल, पण ही लष्करी आघाडी आपले रशिया सारख्या आक्रमकांवविरुद्ध आपले संरक्षण करीलच याची खात्री आता सदस्य देशांना देता येत नाही.

10) अमेरिके विरुद्ध चीन, इराण, रशिया या देशांची युती होण्याला शक्यता आहे.

11) या युद्धात रणगाडे, लांब पल्ल्याची प्रक्षेपणास्त्रे आणि तोफखाना, ड्रोन्स यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. परिणामी जगातील सर्वच मोठ्या सेना दलांना आपल्या व्युहनीतीत व रणनीतीत बदल करावे लागतील.

12) या युद्धाने जागतिक अर्थव्यवस्थेस मोठा धक्का दिला. अनेक ट्रीलियन डॉलर्सचे नुकसान झाले आहे. युक्रेनचे मोठे आर्थिक नुकसान झाले, रशियाचेही नुकसान झाले पण रशियन अर्थव्यवस्था आकाराने मोठी असल्यामुळे आणि रशियातील पायाभूत सुविधांवर युक्रेनने आक्रमण न केल्यामुळे रशियन जनतेला त्या अर्थाने युद्धाची झळ लागली नाही. (प्रबोधन प्रकाशन ज्योती, मार्च 2023,. पृ. 35) अप्रत्यक्षपणे मात्र ती लागली आहे.

13) रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर शीत युद्धानंतर बहुध्रुवी झालेले जग द्विध्रुवी होताना दिसत आहे. यामध्ये अमेकिा व तिची मित्र राष्टे- एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला रशिया, चीन व त्यांची मित्र राष्टे- हे दोन गट संरक्षणाच्या दृष्टीने लष्करी संघटन उभारताना दिसत आहेत. तर तिसरा गट जो अलिप्ततावादी राष्ट्राचा गट, ज्यामध्ये भारत, ब्राझिल, द. आफ्रिकासह तिसऱ्या जगातील अविकसित, विकसनशील राष्ट्रांचा समावेश होतो. एकंदरीत आज जगाची विभागणी तीन गटात होत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे शीत युद्धाच्या आठवणी पुन्हा जाग्या होत आहेत.

वरीलप्रमाणे रशिया- युक्रेन युद्धाचे जागतिक राजकारण व अर्थकारणावर परिणाम झालेले दिसून येतात.

रशिया-युक्रेन युद्धाचे आजचे चित्र पहाता रशियाचा प्रयत्न आपल्या ताकदीचा वापर करून युक्रेनला झुकवण्याचा आहे आणि युक्रेन अमेरिका व प. युरोपच्या पाठिंब्यावर रशियाविरूद्ध चिवट प्रतिकार देत रशियापुढे झुकताना दिसत नाही. आजही रशियाच्या ताब्यात युक्रेनचा मोठा भूभाग आहे. त्यात क्रिमिया सारखे पर्यटन केंद्र व डॉनबास सारखा औद्योगिक प्रदेश व मारियापूल सारखे बंदर आहे. अलिकडे रशियाने युद्धबंदीला काही अटीवर तयारी दाखविली आहे. त्या अटी खालीलप्रमाणे-

1. युक्रेनने नाटोचे सभासदत्त्व घेऊ नये. 2. क्रिमिया हा रशियाचा अविभाज्य भाग आहे, हे मान्य करावे. 3. डॉनबास, खेमेने (खेसर्न), डोनेस्क, लुहास्क (लुगान्सक) आदी जे युक्रेनचे चार प्रांत आहेत. त्यांचे विलिनीकरण मान्य करावे. (प्रबोधन प्रकाशन ज्योती, मार्च-2023 पृ.36) या युद्धात युक्रेनची अपरिमित आर्थिक, मानवी, लष्करी हानी झाली आहे. पायाभूत सुविधांची मोठी हानी झाली आहे. अशा स्थितीत युक्रेनचे अध्यक्ष झेलेंस्की या अटी मानणार नाहीत. उलट अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन(२० फेब्रुवारी 20223) जपानचे पंतप्रधान फूमिओ किशीदा (21 मार्च 2023) यांनी युद्ध भूमीवर येऊन त्यांना पाठिंबा दिल्यामुळे त्यांचे मनोबल वाढले आहे. स्वतः बायडेन यांनी युक्रेनला शस्त्रास्त्रांसाठी पाचशे दशलक्ष डॉक्टरचे नवे पॅकेज जाहिर केले आहे. जपानने तब्बल 4.6 अब्ज डॉलर्स मदतीची घोषणा केली आहे. या मदतीमागचे कारण अमेरिका व प. युरोपला अनायसे रशियाची ताकद खर्ची करण्याची संधी मिळाली आहे. या युद्धानंतर रशियाची ताकद आणि प्रतिष्ठा कमी होणार आहे. युक्रेनने व रशियाने 24-2-2022 पूर्वीची परिस्थिती कायम करावी, युद्धबंदी करावी असा एक

प्रस्ताव आहे पण त्यास रशियाची मान्यता मिळणार नाही. कारण या युद्धात हजारो सैनिक, रणगाडे, तोफा व ड्रोन्स गमावून पदरात काहीच पडणार नसेल तर हे युद्धही अध्यक्ष पुतीन यांची मोठी घोडचूक होती, हे युद्ध त्यांनी गमावले आहे. असा रशियात अर्थ काढला जाईल. युक्रेन कदाचित काही अटींवर मान्यता देईल. मात्र सध्या आहे त्या स्थितीत युद्धबंदीस युक्रेन तयार होणार नाही. कारण रशियाकडे युक्रेनचा मोठा भुप्रदेश राहतो.

वर्तमान रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यास संयुक्त राष्ट्रे संघटना अपयशी ठरली आहे. भारत, चीन व तुर्कस्तान सारखे देश मध्यस्थी करू शकलेले नाहीत. त्यामुळे हे युद्ध ज्याला 'वॉर ऑफ अॅट्रीशन' म्हणजे दीर्घकाळ एकमेकांच्या ताकदी रोखणारे युद्ध ठरले अहे. नव्या वर्षात ते युद्ध कधी संपेल हे सांगने कठीण आहे. कारण त्याबाबतचा पुढाकार ब्लादीमीर पुतीन व रशिया यास घ्यावा लागेल, ज्याची शक्यता सध्या दिस नाही. कारण युद्ध सुरू करणे सोपे असते. पण ते थांवणे अवघड असते हे आता पुतीन यांच्या लक्षात आले असेल. 1979 मध्ये व्हिएतनामवर हल्ला केल्यानंतर व्हिएतनामचा प्रतिकार लक्षात होऊन चीन या युद्धात फार काळ गुंतला जाईल, हे लक्षात येताच चिनी नेते डेंग झिआओ, पेंग यानी आपले सैन्य मागे घेतले होते, हे येथे लक्षात घेणे गरजेचे आहे. (प्रबोधन ज्योती प्रकाशन-मार्च 2023, पृ.36) अशाच काहीशा दृष्टिकोण पुतिन यांनी ठेवून युक्रेन मधून आपले सैन्य, माघारी घेणे रशियाच्या हिताचे ठरेल. अन्यथा हे युद्ध दीर्घकाळ चालले तर रशियाची मोठी आर्थिक, लष्करी व मानवी हानी होऊन जागतिक राजकारणातील तिची ताकद, प्रभाव आणि प्रतिष्ठा याला तडे जातील. थोडक्यात, या युद्धाच्या एक वर्षानंतरही युक्रेन व रशिया या दोघानाही मान्य असलेला तोडगा सोडण्यास युनोला व जगाला यश आले नाही. वर्तमान जागतिकस्थिती व दीर्घकाळ युद्ध चालल्याने होणारे विपरीत परिणाम पहाता, रशिया व युक्रेन यांनी स्वतः पुढाकार घेऊन दोघानांही मान्य असलेला न्याय्य असा व्यवहार्य, तोडगा काढून युद्ध थांबविण्यातच त्यांचे व जगाचे हित आहे.

**संदर्भ :**

1.पांडेय कुमुदिनी, समकालीन अन्तर्राष्ट्रीय मुददे, डिस्कवरी पब्लिशिंग प्राईवेट लिमिटेड, नई दिल्ली, प्रथम संस्करण 2019

2.डॉ. देवळाणकर शैलेन्द्र, समकालीन जागतिक राजकारणः भारताच्या परराष्ट- आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने, विद्या बुक्स पब्लिशर्स औरगाबाद, प्रथमावृत्ती 2014

3.कुलकर्णी प्रसाद (संपा.), प्रबोधन प्रकाशन ज्योती (मासिक) मार्च-2023

4.गुर्जर संकल्प (लेख), रशिया-युक्रेन संघर्षवर्षाची फळे, दै. लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, रविवार, दि. 19 फेब्रुवारी 2023.

5.परांजपे समीर (लेख), कधी थांबणार युद्ध? दै. लोकमत, सारांश पुरवणी, रविवार दि. 19 फेब्रुवारी 2023.

6.दै. लोकमत (संपा.), बायडेन यांचा मनसुबा काय? 22 फेब्रुवारी 2023

7.दै. लोकसत्ता (संपा.), सटवाईला नाही नवरा, अन् ... बुधवार 22 मार्च 2023, पृ.7.